# - प्रकरण पहिले -

## - कालिदासाच्या काव्यातील सांप्रदायिक तत्त्वज्ञान -

## कालिदासाच्या काव्यातील सांप्रदायिक तत्त्वज्ञान

आपल्या साहित्यातून लौकिक तसेच अलौकिक आनंदाचा साक्षात्कार घडविणारा, निसर्गातील सर्व सौंदर्याचा आस्वाद घेणारा व जीवनातील सर्व सुखे मनमुरादपणे लुटणारा कालिदास हा सांप्रदायिक दृष्टयाही तत्वज्ञ होता असे आपल्याला त्याचे साहित्य अभ्यासिले असता आढळून येते. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील श्रुति, स्मृति, पुराणे, षड्दर्शने, शैव - पंचरात्र, उपनिषदे, भगवद्गीता इ. ग्रंथांचा त्याचा सखोल अभ्यास होता. त्याच्या वेगवेगळ्या ग्रंथात विशेषत: "रघुवंश" आणि "कुमारसंभव" या त्याच्या महाकाव्यात आढळणारे तत्त्वज्ञानपर उल्लेख हीच गोष्ट सिध्द करतात. त्याच्या बहुतेक सर्व नाटकांतून आढळून येणारी नांदी आणि कांही भरतवाक्ये ही कालिदास सांप्रदायिक दृष्टया तत्त्वज्ञ असल्याचीच निदर्शक आहेत.

कालिदासाच्या काळांत जैन आणि बौध्द धर्माचा पगडा सर्वत्र होता असे दिसून येते. हिंदु धर्मातील अतिरेकी कर्मकांडात्मक वृत्तीमुळे लोकांच्या मनामध्ये हिंदु धर्माबद्दल नाराजी आणि पर्यायाने बौध्द धर्माबद्दल ओढ निर्माण झाली. भरती-ओहोटीचा हा खेळ जगांत सर्वत्रच आपल्याला दिसून येतो. त्यानुसार हिंदु धर्माच्या ओहोटीचा तो काळ होता आणि बौध्द धर्माच्या भरतीचा. हिंदु धर्मातील कांही विद्वान लोकांना याची जाणीव झाल्यामुळे त्यांनी हिंदु धर्माच्या प्रचारासाठी कांही पावले उचलावयास सुरवात केली. याच काळांत याज्ञवल्क्य, नारद, कात्यायनी इ. स्मृति रचल्या गेल्या. ज्या व्यक्तींच्या मनांमध्ये धर्माभिमान जागृत असतो त्या व्यक्तींच्या कोणत्याही कृतीमध्ये त्यांच्या मनाचे प्रतिबिंब उमटल्याशिवाय राहात नाही. मग ते लेखन असो वा वक्तृत्व वा अन्य कांही. कालिदास हा कांही धर्मप्रचारक नव्हता, तरीही तो हिंदु धर्माचा अभिमानी होता. त्याचा हा धर्माभिमान आणि तत्त्वज्ञानी वृत्ती याचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यांत पडलेले आपल्याला दिसून येते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्याच्या या सर्व साहित्यकृतीवरून निरनिराळ्या तत्त्वप्रणालिंचा त्याचा असलेला अभ्यास आणि त्यातील विचारांशी असलेले साम्य आपण आता पाहूं.

उपनिषदे - तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट ठरलेले ग्रंथ म्हणजे उपनिषदे होत. पाश्चात्य देशांत सर्वाधिक अभ्यास जर कशाचा झाला असेल तर तो म्हणजे उपनिषदांचाच होय. यालाच "वेदान्त" असेही म्हणतात. यातील अद्वैत तत्त्वज्ञानाने सर्व जगाला भारावून टाकले. यानंतरच्या काळांत द्वैत, विशिष्टाद्वैत इ. अनेक विचारप्रवाह उदयास आले. पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत "अद्वैत तत्त्वज्ञानाचे" महत्त्व अबाधितच राहिले. विश्वाच्या उत्पत्ति-पासून अंतापर्यंत समग्र विचार या ग्रंथांत केलेला आपल्याला आढळून येतो.

कालिदास हा अद्वैत तत्त्वज्ञानी होता. कारण त्याच्या या तत्त्वज्ञानाची जबरदस्त छाप त्याच्या विचारांवर पडल्याचे त्याच्या ग्रंथांच्या अभ्यासान्ती आपल्याला आढळून येते. या तत्त्वज्ञानाने त्याला विलक्षण मोहित केले होते हे पुढील कांही श्लोकांवरून आपल्याला दिसून येईल.

१] नमस्त्रिमूर्तये तुभ्यं प्राक् सृष्टे: केवलात्मने ।
गुणत्रयविभागाय पश्चाद् भेदमुपेयुषे ।। कुमार २/४

"कुमारसंभवात" ब्रह्मदेवाच्या केलेल्या या स्तुतीमध्ये एकाच परमेश्वराची गुणानुसार तीन रूपांत केलेली विभागणी त्याच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचीच साक्ष देत नाही काय ?

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् । नान्यत्किंचन मिषत् ।
स ईक्षत लोकान्नु सृजा इति ।। ऐ. उप. १.१

तसेच "सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्" छा. उ. ६, २, १,

तेथेच — तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति. ३

तसेच - "भगवानेक आसेदमग्र आत्मात्मनां विभुः ।" B.P III 5.23.

हाच विचार कालिदासाने पुढील श्लोकातून मांडला आहे.

१] त्रिभिस्त्वमवस्थाभिर्महिमानमुदीरयन् ।
प्रलयस्थितिसर्गाणामेक: कारणतां गत: ।। कुमार. २/६

प्रलय, स्थिति आणि उत्पत्ती या ३ अवस्था एकाच कारणापासून उत्पन्न झाल्याचे सांगून कालिदास आपल्या आवडत्या तत्त्वज्ञानाची येथे पुनरुक्तीच करीत आहे.

एकैव मूर्तिर्बिभेदे त्रिधासौ
सामान्यमेषां प्रथमावरत्वम् ।
विष्णोर्हरस्तस्य हरि: कदाचिद्
वेधास्तयोस्तावपि धातुराधौ ।। कुमार ७/४४

- ब्रह्मा, विष्णु व महेश या तीन रुपांत विभागणी केलेला हा परमेश्वर वस्तुत: एकच आहे. मात्र सामान्य जन यात श्रेष्ठ-कनिष्ठपणाचा भाव आणतात, असे कालिदासाचे मत आहे. या मताने त्याने आपल्या तत्त्वज्ञानाला बळकटी आणली आहे.

कुमारसंभवाप्रमाणे रघुवंशामध्येही कालिदासाने विष्णूची स्तुति केलेली आहे ती याच तत्त्वज्ञानाच्या अनुरोधाने. या सर्व श्लोकांचे मूळ आपल्याला उपनिषदामध्ये सापडते. म्हणूनच कालिदासाचा उपनिषदांचा सखोल अभ्यास होता असे म्हणावेसे वाटते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति ।
यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति । तै. उ. ३, १

तसेच - जन्माधस्य यत: १, १, २, | ब्रह्मसूत्र
आणि - योनिश्च हि गीयते १, ४, २७, |
तसेच - तथाऽक्षरात् विविधा: सोम्य भावा: ।
प्रजायन्ते, तत्र चैवाऽपि यन्ति ।। मुंडकोपनिषद.

रघुवंशातील पुढील कांही श्लोकांमध्ये परमेश्वररूप असलेला विष्णूच कारणपरत्वे भिन्न भिन्न रूपे धारण करतो, असे कालिदास म्हणतो.

१] नमो विश्वसृजे पूर्वं विश्वं तदनुबिभ्रते ।
अथ विश्वस्य संहर्त्रे तुभ्यं त्रेधास्थितात्मने ।। रघु. १०/१६ --

येथे उत्पत्ति, स्थिति व प्रलय करणाऱ्या त्या एकमेव शक्तीला नमन केले आहे.

- याच संदर्भातील रघुवंशातील पुढील श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे.

२] रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोश्नुते ।
देशे देशे गुणेष्वेवमवस्थास्त्वमविक्रिय: ।। रघु. १०/१७ ---

या श्लोकांत निर्विकार परमेश्वराची तुलना पावसाच्या पाण्याशी करून या पाण्याच्या स्थलपरत्वे बदलणाऱ्या चवीप्रमाणेच तू निरनिराळी रूपे गुणांच्या उपाधिमुळे घेतोस असा अद्वैत सिध्दान्तच कालिदास व्यक्त करतो.

---

१] "ब्रह्मत्वे सृजते लोकान् विष्णुत्वे पालयत्यपि । रुद्रत्वे संहरत्येव तिस्त्रोऽवस्था: स्वयम्भुव: ।।" स्मृति.

तसेच - दर्शयन्महिमानं त्वं तिसृभिर्मूर्तिभि: प्रभु: ।
उत्पत्तिस्थितिनाशानामेको भू: कारणं स्मृतम् ।। शिव. पु.

तसेच - रजोजुषे जन्मनि सत्त्ववृत्तये स्थितौ प्रजानां प्रलये तम:स्पृशे ।।
अजाय सर्गस्थितिनाशहेतवे त्रयमियाय त्रिगुणात्मने नम: ।।१।।

२] "आत्मा वा इदमेक एवासीत् ।।" श्रुति.

तसेच ब्रह्माविष्णुरुद्रलक्षणा: सुखदु:खमोह रूपा वा। हिमाद्रि.

तसेच - नमो रजोजुषे सृष्टैयस्थित्यै सत्वमयाय च तमोरुपाय संहारे
त्रिरुपाय स्वयंभुवे ।। श्रुति.
एकं रुपं बहुधा य: करोति - कठोपनिषद.

अशा रीतीने ब्रह्मा, विष्णु व महेश यांची कालिदासाने केलेली ही वर्णने उपनिषदांच्या अध्ययनावरुन निश्चित झालेल्या "एकेश्वर" मताचीच निदर्शक आहेत. या तीनही देवता स्वरुपत: भिन्न असल्या आणि त्यांचे कार्य भिन्न असले तरी ती एकाच परमेश्वराची भिन्न भिन्न रुपे होत, असेच कालिदासाला वरील सर्व श्लोकांवरुन सांगावयाचे आहे. उपनिषदांतील[१] तत्त्वज्ञानही आपल्याला हेच सांगते की, या विश्वाच्या बुडाशी एकच तत्त्व अथवा शक्ती असून तिनेच हे सर्व विश्व व्यापले आहे. या तत्त्वाला तेथे उपनिषत्कारांनी "ब्रह्म" म्हणून संबोधिले आहे. व कालिदासाने याच ब्रह्माचे वर्णन ब्रह्मा, विष्णु अथवा महेश यांच्या रुपात आपल्या ग्रंथात केले आहे. -

उपनिषदांतील हे तत्त्व संपूर्ण विश्वाला व्यापून राहिले आहे, म्हणून ते स्थूल आहे. पण तितकेच सूक्ष्मही आहे. कारण अत्यंत सूक्ष्म जीवाणूंच्यामध्येही ते विद्यमान आहे. तसेच ते व्यक्त आहे व अव्यक्तही, द्रव आहे व घनही. परस्पर विरोधी विशेषणांनी तेथे ते वर्णिले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] स एवाधस्तात्स उपरिष्टात्स पश्चात्स पुरस्तात्स दक्षिणत: स उत्तरत: स एवेदम् सर्वमित्यथातोऽहंकारादेश एवाहमेवाधस्तादहमु - - परिष्टादहं पश्चादहं पुरस्तादहं दक्षिणतोऽहमुत्तरतोऽहमेवेदम् सर्वमिति ।। [छा. उ. अ. ७ ख. २५, १]

तसेच - तस्माद्वा एतस्मादात्मन आकाश: संभूत: । आकाशाद्वायु: । वायोरग्नि: अग्नेराप: । अद्भय: पृथिवी । पृथिव्याओषधय: । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुष: ।

[तै. शिक्षोपनिषद्] [उपनिषद्रत्नप्रकाश -ब्रह्मानंदवल्ली -अनु १, २]

तसेच - स इमाॅंल्लोकानसृजत । अंभो मरीचीर्मरमापोऽदोंऽभ: परेण दिवं द्यौ: प्रतिष्ठान्तरिक्षं मरीचय: । पृथिवी मरो या अधस्तात्ता आप: ।। ऐ. उ.

याचाच आधार घेऊन कालिदासानेही आपल्या या तीन देवतांची स्तुति परस्परविरुध्द अशा विशेषणांनी केलेली आढळते. उदा.

१] द्रव: संघातकठिन: स्थूल: सूक्ष्मो लघुर्गुरु: ।
व्यक्तो व्यक्तेतरश्चासि प्राकाम्यं ते विभूतिषु ।। कुमार. २/११

या श्लोकांत स्थूल- सूक्ष्म, लघु- गुरु, व्यक्त- अव्यक्त, द्रव- घन, इ. विशेषणांनी केलेली ब्रह्मदेवाची स्तुति उपनिषदांतील अस्थूलमनणु, अह्रस्वमदीर्घम् इ. ब्रह्माच्या वर्णनाचीच आपल्याला आठवण करुन देते.

तसेच या श्लोकावरुन आपल्याला कालिदासाचा न्याय आणि वैशेषिक दर्शनांचा अभ्यासही जाणवतो.

अशा रीतीने परस्परविरुध्द विशेषणांनी युक्त असणाऱ्या त्या परमेश्वराचे [ब्रह्माचे] यथार्थ स्वरुप कोण बरे जाणू शकेल ? म्हणून उपनिषत्कार त्याचे वर्णन " नेति नेति " अशा नकारात्मक पध्दतीने करतात. कारण त्याचे स्वरुप असे आहे कां ? असे विचारले असतां नाही । असेच त्याचे उत्तर द्यावे लागते. म्हणजे अगम्य, अप्राप्य असेच त्याचे स्वरुप आहे.

कालिदासानेही या परमेश्वराचे अगम्यत्व पुढील श्लोकांत वर्णिले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] एतद्वै तदक्षरं गार्गि ब्राह्मणा अभिवदन्त्यस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घम - लोहितमस्नेहमच्छायमतम: । बृहदारण्यक. ३, ८, ८.]

तदेजति तन्नैजति तद्दूरे तदन्तिके [ईश. उप. ४, ५, तसेच श्वेता. उप. ३, १७, २०]

तसेच - अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षु: स शृणोत्यकर्ण: [श्वेताश्वेतर ३, १९]

१] प्रत्यक्षोऽप्यपरिच्छेद्यो मह्यादिर्महिमा तव ।
आप्तवागनुमानाभ्यां साध्यं त्वां प्रति का कथा ।। रघु. १०/२८

विष्णूची स्तुति करणाऱ्या या श्लोकांत परमेश्वराच्या अगाध रुपाचे वर्णन कालिदास करतो. ह्याचे स्वरुप इंद्रियांनी ज्ञात होण्यासारखे नाही, म्हणूनच वेदवचन आणि अनुमान यांच्या साहाय्याने त्याला जाणावे लागते. त्यामुळे या परमेश्वराच्या यथार्थ स्वरुपाची कल्पना आपल्याला येऊं शकत नाही असे तो म्हणतो. हा विष्णु वाणी आणि मन यांना अगोचर आहे असे रघु. १०/१५ येथे कालिदासाने म्हटले आहे.

पुढील श्लोकही उपनिषदांतील परमात्म्याशी जुळणारा आहे.

२] सर्वज्ञस्त्वमविज्ञात: सर्वयोनिस्त्वमात्मभू: ।
सर्वभूरनीशस्त्वमेकस्त्वं सर्वरुपभाक् ।। रघु. १०/२०

या श्लोकांत सर्वज्ञ, अगम्य, स्वयंभू, अनीश, इ. वर्णनांनी स्तविलेला विष्णु हा उपनिषदांतील परमात्म्याच्या वर्णनाशी जुळणारा आहे. तेथेही या परमात्म्याला उद्देशून हीच विशेषणे वापरलेली आहेत. या ब्रह्मालाच परमात्मा, हिरण्यगर्भ, परमेश्वर इ. वेगवेगळ्या नावांनी उपनिषदे संबोधतात. तसेच रघुवंशात इतरही कांही श्लोकांत हा विष्णु अज- जन्मरहित असूनही पृथ्वीवर

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] येतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । तै. उप. २, ४, ९.
य: प्रत्यक्षेण दु:साध्य: स कथं प्रमाणान्तरै: साध्य:स्यादिति"
– चरित्रवर्धन आणि वल्लभ.

२] स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरन् शुद्धमपापविद्धम् ।
कविर्मनीषी परिभू: स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान् व्यादधाच्छाश्वतीभ्य:
समाभ्य: ।। ईशावास्योपनिषद् ।।

अवतार घेतो, आप्तकाम असूनही शत्रूंचा नाश करतो, सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करत असूनही उदासीन आहे, सर्व प्राण्यांच्या शरीरांत राहात असूनही तो त्यांच्याजवळ राहात नाही, त्याला कोणतीही इच्छा नाही, आशा - आकांक्षा नाही, तो दयाळू आहे तरीही त्याला दु:ख होत नाही, तो पुराणपुरुष असूनही म्हातारा होत नाही असे कालिदास म्हणतो.

या परमात्म्याचे "कठोपनिषदांत"[१] केलेले वर्णनही वरील वर्णनाशी साम्य पावते. तेथे ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान सर्व कांही परमात्माच आहे म्हणून तो प्रत्यक्ष प्रमाण होऊ शकत नाही असे म्हटले आहे. हा परमात्माच अंतर्बाहय विश्वाच्या रुपाने प्रकाशमान आहे आणि जग ही त्या आत्मरत्नाचीच प्रभा आहे, असे तेथे आपल्याला समजते. जो स्वयंप्रकाशी आहे त्याला कोण प्रकाशविणार ? अग्नि, एवढेच काय पण प्रत्यक्ष चंद्र आणि सूर्यही त्याच्यासमोर निष्प्रभ आहेत असे "कठोपनिषद" सांगते.

"बृहदारण्यकोपनिषदा"मध्येही अशाच प्रकारचे वर्णन आले आहे. कालिदासाच्या ग्रंथातील ब्रह्मा, विष्णु व महेश या तीनही देवतांची परमेश्वररुपाने केलेली स्तुति आणि त्याचे उपनिषदांतील परमात्म्याच्या वर्णनाशी असणारे साम्य पाहतां कालिदासाच्या मनाची उपनिषदांनी घेतलेली पकड, त्याच्या अंत:करणात खोलवर रुजलेले त्यातील तत्त्वज्ञान

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] " न संदृशे तिष्ठति रुपम् अस्य ।
न चक्षुषा पश्यति कश्चिदेनम् ।। " कठोपनिषद.

तसेच - न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकम्
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्नि: ।
तमेव भान्तम् अनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति ।। कठोपनिषद

तसेच - यश्चन्द्रतारके तिष्ठन्श्चन्द्र तारकादन्तरो यं चन्द्रतारकं न वेद यस्य
चन्द्रतारकंशरीरं यश्चन्द्रतारकमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृत:

याचे प्रतिबिंब त्याच्या तत्त्वज्ञानपर विचारावर पडलेले आपल्याला तात्काळ समजून येते. "साहित्य म्हणजे लेखकाच्या मनाचा आरसा" ज्यामध्ये लेखकाच्या विचारांचे भाव-भावनांचे स्पष्ट चित्र उमटलेले असते. आरसा ज्याप्रमाणे व्यक्तीचे वास्तविक रूप दर्शवितो त्याप्रमाणे साहित्यही लेखकाच्या वास्तविक मनाचे प्रतिबिंब दर्शविते. कालिदासाच्या तत्त्वज्ञान-पर विचारावरून त्याच्या मनाची जडणघडण ही अद्वैत वेदान्तानी केलेली असून त्याच्या विचारांचा डोलारा या तत्त्वज्ञानाच्या पायावर उभा आहे आणि म्हणून तो भक्कम आहे असेच आपल्याला दिसते. यावरून आपण निश्चितपणे असा निष्कर्ष काढू शकतो की, कालिदासाच्या तत्त्व-ज्ञानाची बैठक अद्वैत वेदान्ताची आहे.

याच संदर्भात *Bhagwat Saran Upadhyaya* यांनी "*India in Kalidas*" या आपल्या ग्रंथात मांडलेले विचारही महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, "*Kalidas does not specifically allude to the Vedānta philosophy as a system. There is no theory of illusion (māyā), no proper doctrine of the identity of the individual with the absolute except perhaps in one reference. (* ब्रह्मभूतं गतिं *- Raghu.) He refers instead to the popular Vedānta and the pantheistic conception of God. His panegyrical prayers embody the sprit of the Upanisads and the Bhagvadgita, (Chapter XIX - Philosophy - Vedānta - P.N. 343-344)*"

<u>शंकरोपासक कालिदास</u> - कालिदासाच्या साहित्याकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिले असतां आपणी एक गोष्ट आपल्या नजरेस भरते ती म्हणजे, ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तीनही देवतांच्याबद्दल त्याच्या मनांत सारखाच भक्तिभाव असला तरी भगवान् शंकर हेच त्याचे उपास्य दैवत होते.

याठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे, ऋग्वेदांतील इंद्र, अश्विनीकुमार, उषस्, वरुण इ. देवतांचे महत्त्व कालिदासाच्या काळांत कमी झालेले होते आणि त्यांची जागा ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तीन देवतांनी घेतलेली होती. अर्थात अनुक्रमे उत्पत्ति, स्थिति, आणि संहार करणा-या या तीनही देवतां जनमानसांत सारख्याच लोकप्रिय होत्या. कालिदासानेही यापैकी कोणालाच आपल्या साहित्यांत गौण मानले नाही वा श्रेष्ठत्व दिलेले नाही. प्रसंगानुरूप प्रत्येकाचीच स्तुति निःपक्षपातीपणे केलेली आहे. उदा. केवळ नामस्मरणाने भक्तांना पापमुक्त करणाऱ्या विष्णूचे माहात्म्य तो पुढील श्लोकात वर्णितो.

केवलं स्मरणेनैव पुनासि पुरुषं यतः ।
अनेन वृत्तयः शेषा निवेदितफलास्त्वयि ।। रघु. १०/२९

तर देवाधिदेव म्हणून ब्रह्मदेवाला तो पुढील श्लोकांत गौरवितो.

त्वं पितृणामपि पिता देवानामपि देवता ।
परतोऽपि परश्चासि विधाता वेधसामपि ।। कुमार. २/१४

असे असले तरीही सर्वच पदार्थांबद्दल रुचि वाटणाऱ्या पण त्यातील एखादाच पदार्थ अधिक प्रिय असणाऱ्या एखाद्या व्यक्तीप्रमाणे सर्वच देवतांबद्दल सारखी आत्मीयता बाळगणाऱ्या कालिदासाच्या मनांत भगवान् शंकरांबद्दल अधिक भक्तिभाव वसत होता हे निश्चित. त्याच्या ग्रंथांच्या परीक्षणान्ती ही गोष्ट आपल्याला ताबडतोब समजून येते. कारण प्रिय व्यक्तीचा पुनरुच्चार नकळत माणसाच्या मुखावाटे पुनःपुन्हा होत असतो तद्वत कथानकाच्या ओघात प्रसंग नसतानाही आपल्या इष्ट देवतेची स्तुति त्याने वारंवार केलेली आहे.

उदाहरणच सांगावयाचे झाल्यास "मेघदूत" या आपल्या निसर्गवर्णनपर आणि शृंगारिक खंडकाव्यात कोठेही भगवान् शंकराचा उल्लेख येण्याचे कारण नाही. पण कालिदासाने मुद्दाम हे उल्लेख आणले आहेत. उज्जयिनी

ही त्याची आवडती नगरी असल्यामुळे प्रवासमार्गात येत नसतानाही वाकडी वाट करून यक्ष मेघाला त्या नगरीला जाण्याचे सांगतो हे मान्य. पण याचबरोबर येथील महाकालाचे दर्शन घेतल्याशिवाय तू पुढे जाऊं नकोस हे सांगावयास तो विसरत नाही हे महत्त्वाचे. महाकाल म्हणजेच शंकराबद्दलचा भक्तिभावच येथे प्रकट होत नाही काय ?

याच काव्यात इतरत्रही आपल्या इष्ट देवतेचे उल्लेख कालिदासाने मुद्दाम आणले आहेत. उदा.

तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौले:
शश्वत्सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्र: परीया: ।
यस्मिन्दृष्टे करणविगमादूर्ध्वमुद्धूतपापा:
संकल्पन्ते स्थिरगणपदप्राप्तये श्रद्दधाना: ।। मेघ. पूर्व. ५५

याठिकाणी ज्याच्या दर्शनाने मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होऊन अखेर शिवगणांच्या शाश्वत पदाला पोचतो त्या भगवान् शंकराच्या चरणन्यासाचे दर्शन न विसरता घेण्यास यक्षाने मेघाला सांगितले आहे.

याशिवाय मेघदूतातील ३३, ३६, ४३, ५०, ५२, ५६, ५८, ६० इ. श्लोकांमधील भगवान् शंकराविषयीचे उल्लेख त्याची शिवभक्तिच व्यक्त करतात.

आपल्या नाटकांच्या नांदीमध्येही कालिदासाला शंकराखेरीज इतर देवतांची स्तुति करतां आली असती पण ही गोष्ट टाळून कालिदासाने आपल्या इष्ट देवतेलाच तेथे पूजिले आहे. म्हणजे ज्याठिकाणी इच्छेचा प्रश्न येतो तेथे कालिदास शंकराला विसरलेला नाही असे दिसते. पर्याय असतांनाही एखादी गोष्ट मनुष्य जेव्हां उत्स्फूर्तपणे निवडतो तेव्हां त्या गोष्टीबद्दलचे त्या व्यक्तीचे प्रेमच त्याठिकाणी दिसून येते. त्याच्या तीनही नाटकांच्या नांदीवरून ही गोष्ट आपल्याला प्रकर्षाने जाणवते.

आपल्या "अभिज्ञानशाकुंतला"च्या नांदीमध्ये हा शिव जल, अग्नि, यजमान, रात्र आणि दिवस, चंद्र आणि सूर्य, आकाश, पृथ्वी, वायु या आठ मूर्तींनी युक्त असल्याचे कालिदास सांगतो. पाहा,

> या सृष्टि: स्त्रष्टुराद्या, वहति विधिहुतं या हविर्या च होत्री
> ये द्वे कालं विधत्त:, श्रुतिविषयगुणा या स्थिता व्याप्य विश्वम् ।
> यामाहु: सर्वभूतप्रकृतिरिति, यया प्राणिन: प्राणवन्त:
> प्रत्यक्षाभि: प्रपन्नस्तनुभिरवतु वस्ताभिरष्टाभिरीश: ।। अभि. शां. १

याच नाटकाच्या भरतवाक्यांत,

> ममापि च क्षपयतु नीललोहित:
> पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभू: ।। अभि. शां. ३५

म्हणून त्याच्या सामर्थ्याचा गौरव करून पुनर्जन्मातून स्वत:ची सुटका करण्याविषयी विनविले आहे ते भगवान् शंकरानांच.

> वेदान्तेषु यमाहुरेकपुरुषं व्याप्य स्थितं रोदसी
> यस्मिन्नीश्वर इत्यनन्यविषय: शब्दो यथार्थाक्षर: ।
> अन्तर्यश्च मुमुक्षुभिर्नियमितप्राणादिभिर्मृग्यते
> स स्थाणु: स्थिरभक्तियोगसुलभो नि:श्रेयसायास्तु व: ।। विक्रमो. -१

या "विक्रमोर्वशीयम्" नाटकाच्या नांदीत चराचर विश्वाला व्यापून राहिलेल्या, ईश्वर ह्या संज्ञेला सर्वार्थाने पात्र असणाऱ्या, व अंतर्यामी वसत असलेल्या या भगवान् शंकराजवळच सर्वांच्या पारमार्थिक कल्याणाविषयी प्रार्थना केली आहे. तर याच परमेश्वराजवळ सर्वांची तामसी वृत्ती नष्ट करण्यासाठी कवीने पुढील श्लोकात मागणे मागितले आहे -

> एकैश्वर्ये स्थितोऽपि प्रणतबहुफले य: स्वयं कृत्तिवासा:
> कान्तासम्मिश्रदेहोऽप्यविषयमनसां य: पुरस्ताद्यतीनाम् ।
> अष्टाभिर्यस्य कृत्स्नं जगदपि तनुभिर्बिभ्रतो नाभिमान:
> सन्मार्गालोकनाय व्यपनयतु स वस्तामसीं वृत्तिमीश: ।। मालविका. १

त्यागी, निगर्वी व भक्तांच्यावर तात्काळ संतुष्ट होणाऱ्या शंकरालाच येथे कालिदासाने गौरविले आहे.

या तीनही नाटकांच्या नांदीखेरीज "कुमारसंभव" हे तर भगवान् शंकराचे माहात्म्य वर्णन करणारेच काव्य असल्याने त्याचे वर्णन विपुल प्रमाणांत तेथे आढळते. त्याच्या मंगलमय स्वरूपाचे वर्णन करतांना कालिदास तेथे म्हणतो,

आकिंचन सन् प्रभव: स संपदां
स लोकनाथ: पितृसद्मगोचर: ।
स भीमरूप: शिव इत्युदीर्यते
न सन्ति याथार्थ्यविद: पिनाकिन: ।। कुमार. ५/७७

शंकराच्या स्वरूपाचे गुणगान करतांना कवि त्यात तन्मय होऊन जातो, आणि लोकनाथ, वैभवसंपन्न, मंगल अशा विशेषणांनी संबोधूनही मन तृप्त न झाल्याने त्याचे यथार्थ स्वरूप कळण्यास असमर्थ असल्याचा कबुलीजबाब तो येथे देतो.
तसेच "तिर्यगूर्ध्वमधस्ताच्च व्यापको महिमा हरे:" या श्लोकार्धात त्याचा महिमा त्रैलोक्यात व्यापून राहिल्याचे सप्तर्षींच्या द्वारा तो हिमालयाला सांगतो.

अशी एक नाही तर असंख्य श्लोकस्तुतिसुमने कालिदासाने आपल्या इष्ट देवतेच्या चरणी वाहिली आहेत. स्वतःच नव्हे, तर प्रत्यक्ष ब्रह्मदेव आणि विष्णूही भगवान शंकराची स्तुति करतात असे कुमारसंभवात दाखवून त्याने शंकराचे माहात्म्य शतगुणित केले आहे.

वरील सर्व श्लोकांच्यावरून आणि संधी मिळेल तेथे अथवा मिळाली नसतानाही वेळोवेळी व्यक्त केलेल्या शंकराविषयीच्या आदरभावावरून आपण निश्चितपणे असे म्हणू शकतो कीं, कालिदास हा शिवभक्त होता. या त्याच्या शिवभक्तिवरून असेही मत मांडले जाते कीं तो शैव संप्रदायाचा होता. पण

याबाबतीत सर्वांच्यामध्ये एकमत झालेले दिसत नाही. या संदर्भात आपल्या "कालिदास" या ग्रंथात महामहोपाध्याय डॉ. वि. वा. मिराशी म्हणतात कीं, त्याच्या ग्रंथात कोठेही साम्प्रदायिक पारिभाषिक संज्ञांचा किंवा विशेष आचारांचा उल्लेख सापडत नाही. [कालिदासाचे विचार - प्रकरण८]

यामुळे " तो शैव सम्प्रदायाचा होता" असे विधान करणे युक्त नव्हे. पण तो शिवभक्त होता हे निःसंशय होय.

भगवद्गीता - श्रीमद्भगवद्गीतेला "गीतोपनिषद्" असे म्हटले जाते. गीता हे वैदिक विद्येचे सार आहे, आणि वैदिक साहित्यातील एक सर्वात महत्त्वाचे उपनिषद् आहे. त्यामुळे उपनिषदातील तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेली व्यक्ती भगवद्गीतेपासून दूर कशी राहील ? कालिदासाच्या बाबतीतही ही गोष्ट सत्य आहे. उपनिषदांप्रमाणेच भगवद्गीतेनेही त्याला प्रभावित केले होते हे त्याच्या साहित्यातील तात्त्विक विचारांवरून आपल्याला स्पष्टपणे समजून येते. त्याच्या ग्रंथातील कित्येक श्लोकांवर गीतेतील श्लोकांचा प्रभाव पडला आहे. उदा.

१] अनवाप्तमवाप्तव्यं न ते किञ्चन विद्यते ।
लोकानुग्रह एवैको हेतुस्ते जन्मकर्मणोः ।। रघु. १०/३१

या विष्णुस्तवनार्थ आलेल्या श्लोकाचे भगवद्गीतेतील तिसऱ्या अध्यायातील श्लोकाशी अत्यंत साम्य आहे.

या दोन्ही श्लोकांत कर्मयोगाचे महत्त्व सांगताना परमेश्वरही "लोकसंग्रहार्थ" कर्मे करीतच असतो असे म्हटले आहे.

---

१] न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।। भ. गी. ३/२२

"कुमारसंभवा"मध्ये ब्रह्मदेवस्तुतीपर आलेल्या कांही श्लोकांमध्येही हेच दिसून येते. उदा.

१] त्वं पितॄणामपि पिता देवानपि देवता ।
परतोऽपि परश्चासि विधाता वेधसामपि ।। कुमार. २/१४

तारकासुराच्या त्रासाला कंटाळून गेलेल्या सर्व देवांनी ब्रह्मदेवाला शरण जाऊन त्याची केलेली स्तुति भगवद्गीतेत श्रीकृष्णाने नवव्या अध्यायांत स्वत:च्या केलेल्या वर्णनाशीच जुळणारी आहे. फक्त फरक एवढाच की, येथे स्तुति करणारे देव असल्यामुळे ते परमेश्वररूप ब्रह्मदेवाला तूच सर्व कांही आहेस, व तूच विश्वाला व्यापून राहिला आहेस असे म्हणतात, तर भगवद्गीतेत भगवान् श्रीकृष्ण हे स्वत:चेच परमेश्वररूपाने वर्णन करतात. त्यामुळे ते "मीच सर्व कांही असून सर्व विश्वांत भरून राहिलो आहे असे म्हणतात. म्हणजेच या सर्व श्लोकांतील कल्पना एकच आहे ती म्हणजे, आदिशक्ती जिला आपण परमेश्वर, परमात्मा, ब्रह्म वा अन्य नावांनी ओळखतो, तीच सर्वव्यापक असून तिच्याखेरीज बाकी कोणत्याही गोष्टीला अर्थ अथवा अस्तित्व नाही. हा विचार उपनिषदातून भगवद्गीतेत व तेथून कालिदासाने उचलला आहे. "कुमारसंभवातील" पुढील श्लोकही वरील वर्णनाशी जुळणारा आहे.

२] त्वमेव हव्यं होता च भोज्यं भोक्ता च शाश्वत: ।
वेद्यं त्वं वेदिता चासि ध्याता ध्येयं च यत्परम् ।। कुमार. २/१५

---

१] पिताहमस्य जगतो माता धाता पितामह: ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ।। भ. गी. ९/१७.

२] अहं क्रतुरहं यज्ञ: स्वधाहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ।। भ. गी. ९/१६

"कुमारसंभवातील" वरील दोनही श्लोकांत हे ब्रह्मदेवा तूच पितरांचा पिता, देवतांची देवता, यजमान, आहुति, उपभोग घेणारा व उपभोग्य वस्तू, जाणणारा व जाणून घेणारा, ध्याता व ध्यान करण्यास योग्य असा आहेस असे म्हटले आहे.

कालिदासाच्या ग्रंथातील असे कित्येक श्लोक त्याच्या भगवद्गीतेने भारावलेल्या मनाची साक्ष देतात. योगसाधन, निष्कामकर्मयोग आणि भक्तियोग हे एकाच परमेश्वरापर्यंत पोचण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. प्रत्येक माणसाने आपल्या शक्तिनुसार या मार्गांचा उपयोग केला पाहिजे हा विचार कालिदासाने उचलला आहे तो गीतेतूनच. तो म्हणतो,

बहुधाप्यागमैर्भिन्ना: पन्थान: सिध्दिहेतव: ।
त्वय्येव निपतन्त्योघा जाह्नवीया इवार्णवे ।। रघु. १०/२६

"निरनिराळ्या नद्यांचे प्रवाह सागराला जाऊन मिळतात, त्याप्रमाणे निरनिराळ्या दर्शनाप्रमाणे पुरुषार्थसाधनाचे मार्ग निरनिराळे असले तरी ते तुझ्याच ठिकाणी येऊन मिळतात. "यामध्ये वेगवेगळ्या तत्त्वप्रणालींचा एकच ध्येय गाठण्याचा उद्देश नद्यांच्या दृष्टान्ताद्वारा कालिदासाने सांगितला आहे.

१] भगवद्गीतेत हाच विचार मांडताना भगवान् श्रीकृष्ण म्हणतात कीं, ध्यानाने, ज्ञानमार्गाने किंवा निष्कामकर्मयोगद्वारा व्यक्तीं परमात्म्यापर्यंत पोचतात. म्हणजे उद्दिष्ट एकच असले तरी प्रत्येक व्यक्ती स्वशक्तिनुसार मार्ग निवडते. यामुळे अभ्यास, ज्ञान, ध्यान वा निष्कामकर्मयोग यापैकी कोणताही मार्ग परमेश्वर प्राप्तीसाठी माणसाने निवडावा.

---

१] ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ।। भ. गी. १३/२५

तसेच - श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाध्द्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ।। भ. गी. १२/१२

यावरून कालिदास भगवद्गीतेतील मतांशी पूर्ण सहमत होता असेच दिसून येते.

<u>योगशास्त्र</u> - "योग" ही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. "योग" म्हणजे परमेश्वरापर्यंत पोचण्याचा एक मार्ग. परमेश्वराशी युक्त होण्याच्या पध्दतीला "योग" म्हणतात. या योगाच्या क्रमश: असणा-या पाय-यांचे वर्णन पातंजल योगशास्त्रामध्ये आपल्याला पाहावयास मिळते.

या योगशास्त्राचाही कालिदास सखोल अभ्यासक होता असे त्याच्या ग्रंथातील योगावस्थेच्या वर्णनावरून आपल्याला समजते. यादृष्टीने भगवान् शंकराचे योगारूढ अवस्थेतील वर्णन पाहणे येथे अगत्याचे ठरेल. या वर्णनांत योगशास्त्रांतील अत्यंत सूक्ष्म अवस्थेचे वर्णन कालिदासाने केले आहे. या दृष्टीने ३ ऱ्या अध्यायातील ४३ ते ५० हे सर्वच श्लोक महत्त्वाचे आहेत. ते श्लोक असे,

दृष्टीप्रपातं परिहृत्य तस्य काम: पुर:शुक्रमिव प्रयाणे ।
प्रान्तेषु संसक्तनमेरुशाखं ध्यानास्पदं भूतपतेर्विवेश ।। कुमार ३/४३
सदेवदारुद्रुमवेदिकायां शार्दूलचर्मव्यवधानवत्याम् ।
आसीनमासन्नशरीरपातस्त्रियम्बकं संयमिनं ददर्श ।। कु. ३/४४
१] पर्यङ्कबन्धस्थिरपूर्वकायमृज्वायतं संनमितोभयासम् ।
उत्तानपाणिद्वयसंनिवेशात्प्रफुल्लराजीवमिवाङ्कमध्ये ।। ३/४५

---

१] एकं पादमथैकस्मिन्विन्यस्योरौ तु संस्थितम् । इतरस्मिंस्तथैवोरुं वीरासनमुदाहृतम् ।। वसिष्ठ.

तसेच - उत्तानिने करतले करमुत्तनितंपरम् । आदायाङ्कगतं कृत्वा ध्यायेयस्तस्य सोन्तरम् ।। " योगसूत्र.

भुंजंगमोन्नद्धजटाकलापं कर्णावसक्तद्विगुणाक्षसूत्रम् ।
कण्ठप्रभासङ्गविशेषनीलां कृष्णत्वचं ग्रन्थिमतीं दधानम् ॥ ३/४६

किंचित्प्रकाशस्तिमितोग्रतारैर्भ्रूविक्रियायां विरतप्रसङ्गैः ।
१] नेत्रैरविस्पन्दितपक्ष्ममालैर्लक्ष्यीकृतघ्राणमधोमयूखैः ॥ ३/४७
अवृष्टिसंरम्भमिवाम्बुवाहमपामिवाधारमनुत्तरंगम् ।
अन्तश्चराणां मरुतां निरोधान्निवातनिष्कम्पमिव प्रदीपम् ॥ ३/४८
कपालनेत्रान्तरलब्धमार्गैर्ज्योतिःप्ररोहैरुदितैः शिरस्तः ।
मृणालसूत्राधिकसौकुमार्यां बालस्य लक्ष्मीं ग्लपयन्तमिन्दोः ॥ ३/४९

२] मनो नवद्वारनिषिद्धवृत्ति हृदि व्यवस्थाप्य समाधिवश्यम् ।
यमक्षरं क्षेत्रविदो विदुस्तमात्मानमात्मन्यवलोकयन्तम् ॥ ३/५०

याठिकाणी रुद्राक्षमाळ धारण केलेल्या, वीरासन घातलेल्या आणि नासिकाग्रावर दृष्टी रोखलेल्या तेज:पुंज आणि जितेंद्रिय अशा जटाधारी शंकराच्या योगावस्थेचे वर्णन हे कालिदासाच्या योगविषयक ज्ञानाचीच साक्ष देणारे आहे. योगाच्या ज्या विविध पायऱ्या योगसूत्रामध्ये दिलेल्या आहेत त्यांच्याशी हे वर्णन तंतोतंत जुळते.

३] योगसूत्राप्रमाणेच भगवद्गीतेतील योगवर्णनाशीही हे वर्णन जुळते. सहाव्या अध्यायांत योग, योगी व योगावस्था यांचे वर्णन करतांना भगवान् श्रीकृष्णांनी वरील सर्व गोष्टींचा उल्लेख तेथे केला आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] करणान्यबहिष्कृत्य स्थाणुवन्निश्चलात्मकः । आत्मानं हृदयेध्यायेन्नासाग्रन्यस्तलोचनः । योगसूत्र.
तसेच - ददर्श तत्र चेशानं नासाग्रकृतलोचनम् Br. P.

2-3] भगवद्गीतेत ६ व्या अध्यायात ११ ते १५ या श्लोकांशी जुळणारे वरील वर्णन आहे. विशेषत: या वर्णनातील ४४, ४७, ५० हे श्लोक भ. गी. ६/१३ शी जुळतात.

याप्रमाणेच "रघुवंश" व "कुमारसंभवमधील" आणखी काही श्लोक असे आहेत की जे कालिदासाचा योगशास्त्राविषयीचा सूक्ष्म अभ्यासच व्यक्त करतात. उदा.

१] वीरासनैर्ध्याननिजुषामृषीणाममी समध्यासितवेदिमध्या: ।
निवातनिष्कम्पतया विभान्ति योगाधिरूढा इव शाखिनोऽपि ।।
रघु. १३/५२

या श्लोकात कालिदासाने वीरासन घालून ध्यानधारणा करणाऱ्या ऋषींच्या बरोबर तेथे असणाऱ्या वृक्षांची तुलना करून हे वृक्षही ऋषींच्याप्रमाणेच ध्यान करीत असल्याचे म्हटले आहे. हे वर्णन योगसूत्रामधील "धारणे"च्या व्याख्येशी जुळते. तर

२] नृपति: प्रकृतीरवेक्षितुं व्यवहारासनमाददे युवा ।
परिचेतुमुपांशु धारणां कुशपूतं प्रवयास्तु विष्टरम् ।। रघु. ८/१८

याठिकाणी अज राजा धर्मासनावर तर रघु योगाभ्यासाठी एकांतात दर्भासनावर बसल्याचे कवि वर्णितो. तसेच

३] अथ कश्चिदजव्यपेक्षया गमयित्वा समदर्शन: समा: ।
तमस: परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघु: ।। रघु. ८/२४

या श्लोकात योगसमाधिसाधनांच्या द्वारे अविद्येच्या पलीकडे असलेल्या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१] देशबन्धश्चित्तस्य धारणा [योग सू. ३/१], कुमार ३,८८
तसेच - यमादिगुणयुक्तस्य मनस: स्थितिरात्मनि । धारणेत्युच्यते सद्भि: शास्त्रतात्पर्यविदिभि: " इति - योगयाज्ञवल्क्यस्तु
२] प्रत्ययैकतानता ध्यानम् [योग. सू. ३. २]
३] तदेवार्थमात्रनिर्भासम् स्वरूपशून्यामिव समाधि:
कुमार ३.४०, ५.६,४५, [योग सू. ३. ३] रघु. १३.५२

अविनाशी अशा परमेश्वराला रघु प्राप्त करतां झाला असे कालिदास म्हणतो.

उमारूपेण ते यूयं संयमस्तिमितं मन: ।
शंभोर्यतध्वमाक्रष्टुमयस्कान्तेन लोहवत् ।। कुमार २/५९

या सर्वश्लोकांमधून योगविद्येचे केलेले वर्णन हे योगसूत्राचा उत्तम अभ्यास असणारी व्यक्तीच करु शकेल.

दर्शने - तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात उपनिषदे आणि भगवद्गीता, यांच्याइतकेच दर्शन वाङ्मयालाही महत्त्व आहे. जीव, जगत्, आत्मा, परमात्मा इ. संबंधीचे सविस्तर विवेचन या ग्रंथात केलेले आपल्याला आढळून येते. या दर्शन वाङ्मयाशीही कालिदासाचा दाट परिचय असावा असे वाटते. वेदान्त, सांख्य आणि योगदर्शनातील विचार त्याच्या ग्रंथात विपुल प्रमाणांत आढळतात. तो अद्वैत वेदान्ती असून योगशास्त्राचा त्याचा सखोल अभ्यास होता. यामुळे वेदान्त आणि योगदर्शनातील अनेक उल्लेख त्याच्या साहित्यांत आपल्याला आढळून येतात. याचप्रमाणे सांख्य दर्शनविषयक कांही उल्लेखही आढळतात. उदा.

अमेयो मितलोकस्त्वमनर्थी प्रार्थनावह: ।
अजितो जिष्णुरत्यन्तमव्यक्तो व्यक्तकारणम् ।। रघु. १०/१८

या श्लोकांत आलेली अमेय, अजित, अनर्थी इ. परमेश्वराची लक्षणे वेदान्त आणि सांख्य दर्शनातील तत्त्वज्ञानाला अनुसरुन आहेत.

1] तसेच - बहुधाप्यागमैर्भिन्ना पन्थान: सिध्दिहेतव: ।
त्वय्येव निपतन्त्योघा जाह्नवीया इवार्णवे ।। रघु. १०/२६

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. यथाद्रिप्रभवा नद्य: पर्जन्यापूरिता: प्रभो ।
विशन्ति सर्वत: सिन्धुमध्वानस्त्वां तथाखिल: ।। पद्म.

येथे वेगवेगळ्या मार्गांनी एकाच परमेश्वरापर्यन्त पोचणा-या सांख्यदर्शनातील तत्त्वज्ञानाचा उल्लेख आलेला आहे.

१] याप्रमाणेच - रघुरप्यजयत् गुणत्रयं प्रकृतिस्थं समलोष्टकाञ्चन: ।। रघु. ८/२१

या श्लोकार्धात सांख्यदर्शनातील प्रकृतीच्या ठिकाणी असणा-या सत्त्व, रज, तम या गुणांना रघूने जिंकले होते असे कालिदास म्हणतो. या त्रिविध गुणांमुळेच प्रत्येक व्यक्ती विकाराधीन होते आणि सुख-दु:खाच्या भोव-यांत सापडते. पण विवेकप्राप्ती ही या सर्व विकारांवर मात करते. आणि रघूने हा विवेक प्राप्त केलेला होता. त्यामुळे सोने आणि माती यांना तो समान समजत असे.

रघुवंशातील पुढील श्लोकातही प्रकृतीच्या या तीन गुणांचा उल्लेख आला आहे.

जाने वो रक्षसाक्रान्तावनुभावपराक्रमौ ।
अङ्गिनां तमसेवोभौ गुणौ प्रथममध्यमौ ।। रघु. १०/३८

याठिकाणी रावणाचे तमोगुणाशी साम्य दर्शविले आहे. आणि त्याने देवांचा पराक्रम आणि मोठेपणा झाकून टाकला आहे. ज्याप्रमाणे तमोगुण सत्त्व व रज हे गुण झाकून टाकतो.

याचबरोबर "कुमारसंभवातील" ब्रह्मदेव व शंकर यांचे वर्णन व रघुवंशातील विष्णूचे वर्णन यावरही सांख्यदर्शनातील तत्त्वज्ञानाची छाप उमटलेली आपल्याला दिसते. या सर्व देवांना कालिदास "पुराणपुरुष" म्हणतो. आणि हा शब्द विशेषत: सांख्यतत्त्वज्ञानातील "पुरुष" या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. सत्त्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृति: । सां. सू. १. ६१, का. १६
तसेच - "प्राधानाश्रिता गुणा: पुरुषस्तु निर्गुण:
इति ज्ञानमपवर्ग इति ।। " सांख्य

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तत्त्वाला उद्देशून वापरलेला आढळतो. कालिदास या पुरुषाला उदासीन[1] व तद्दर्शी[2] मानतो. [कुमार २/११] इतर ठिकाणी तो दर्शितविषय म्हणून उल्लेखला जातो. [योगसूत्र भाष्य].

साहित्याचे एक थोर अभ्यासक व विचारवंत *B.S.Upadhyaya* आपल्या " *India in Kalidasa* " या ग्रंथात म्हणतात -

" *Kalidasa seems to accept the sankhya-Yoga view of the nature of the universe. The three constituents of Nature, Sattva (light), Rajas (activity) and Tamas (inertia) have found constant mention in his works. (Ku.II.4, Raghu.,VIII.21 x.38.Mal.,1). The mystic three or the triad of gunas (trigunas) residing in prakruti (Prakrutistham Raghu,VIII.21) are the Sattva, Rajas and Tamas. Prakruti is the state of perfect equipoise of these three gunas.* ( सत्त्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः *Sankhya-Sutra,I.61 also karika 16).*

*Prakruti - The thriad of gunas is a term familiar to all the systems of Hindu philosophy. The life of man with all its virtues, motives, feelings, passions, aspirations and actions of all kinds are supposed to have been generated from the three gunas.* (त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं- *Mal.1) P.341.*

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

1] असङ्गो ह्ययं पुरुषः । बृ.उप.४. ३/१५
तस्माच्च विपर्यासात्सिद्धं साक्षित्वमस्य पुरुषस्य ।
कैवल्यं माध्यस्थं द्रष्टृत्वमकर्तृभावश्च ।। सा.का.१९.

2] द्रष्टा दृशिमात्रः शुद्धोऽपि प्रत्ययानुपश्यः
[यो. सू. २/२०] [सा. सू. २/१.६१, १.६३]

*Prakruti (Ku.II.13) is, according to the Sankhya School, the root cause in the formation of the universe.*
( मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्या: प्रकृतिविकृतय: सप्त ।
षोडशकस्तु विकारो न प्रकृतिर्न विकृति: पुरुष:
*Sankhyakarika,3, cf* प्रकृतेर्महान्महतोऽहंकार: *S.Sutras cf. Katha I.I.,10,11,II.3,7,8, also Ku.,II,II* व्यक्ताव्यक्तेतरश्चासि]
*Following sankhyas, the poet calls it avyakta. (Raghu.x.18)*

*Purusa - Kalidasa characterizes purusa as Udasina and taddarsi. (ku.II.13)*

*Buddhi - The sankhya concepton of Buddhi (mahattatva) or, intellect has also been alluded to by Kalidasa in his phrase budderivavyaktam. (Raghu.XIII.60;c.f. Vik.P.61)*

या सर्व कालिदासीय ग्रंथातील उल्लेखावरून त्याचे सांख्यदर्शन विषयक असलेले सखोल ज्ञान आपल्याला समजून येते.

वैशेषिक दर्शन - शब्द हा आकाशाचा गुण आहे. या वैशषिक दर्शनातील तत्त्वाचा उपयोग पुढील श्लोकात कालिदास करतो.

शब्दादीन्विषयान्भोक्तुं चरितुं दुश्चरंतप: । रघु. १०/२५
पर्याप्तोऽसि प्रजा: पातुमौदासीन्येन वर्तितुम् । सांख्य. व नैय्यायिक.
अथात्मन: शब्दगुणं गुणज्ञ: पद विमानेन विगाहमान: । रत्नाकरं वीक्ष्य मिथ: स जायां रामाभिधानो हरिरित्युवाच ।। रघु. १३/१

अशा रीतीनेच मींमासा व न्यायदर्शनातील कांही उल्लेखही त्याच्या ग्रंथात आढळतात. यावरून कालिदासाचा दर्शन वाड्.मयाशी जवळून असलेला परिचयच आपल्याला दिसून येतो.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील मान्यताप्राप्त अशा महत्त्वाच्या ग्रंथाशी कालिदासाची असणारी दाट जवळीक आणि कांही साम्यस्थळे

पाहिल्यानंतर, त्याचा जीवनविषयक दृष्टीकोन काय होता ? त्याबद्दल त्याची नेमकी मते काय होती ? हे पाहणे हे ओघाने आलेच. तेव्हां त्याचा ही विचार आपण केला पाहिजे.

कालिदासाची मते -

मोक्ष - मोक्षप्राप्ति हेच मानवाचे अंतिम ध्येय असले पाहिजे असे कालिदासाचे स्पष्ट मत होते. आणि या आपल्या मताचा पुनरुच्चार अनेक ठिकाणी कालिदासाने केला आहे. जीवनातील सर्व सुखांचा मनमुरादपणे आस्वाद घेणाऱ्या या कालिदासाला आयुष्याच्या उत्तरकाली मुक्तीची तळमळ लागलेली होती असे त्याच्या अभि. शां. तील भरतवाक्यावरून वाटते. कारण तेथे त्याने आपल्या इष्ट देवतेकडे हेच मागणे मागितले आहे. तो म्हणतो -

ममापि च क्षपयतु नीललोहित:
पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभू: ।। अभि. शां. ७/

जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करणाऱ्या मोक्षाची कामना तो करतो.

दु:खविरहित जीवनाची ओढ जगातल्या प्रत्येक व्यक्तीलाच असते. पण या ऐहिक जीवनांत ती गोष्ट अशक्य असल्याने प्रत्येक सर्वसामान्य मनुष्य मृत्यूनंतर कामना करतो त्या स्वर्गाची, जेथे फक्त आनंदच असून सतत सुखांची बरसात होत असते. जेथे दु:खाचा लवलेशही असत नाही. पण मानवाला हे कळत नाही की हे स्वर्गीय सुखही नश्वर आहे. कारण पुण्य संपले कीं त्याला पुन्हा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो. त्यामुळेच स्वर्गप्राप्ती हे जीवनाचे अंतिम ध्येय तो मानतो.

पण कालिदास हा विवेकी असल्यामुळे, अद्वैत वेदान्ती असल्यामुळे आणि जीवनाचा अंतर्मुख होऊन विचार करीत असल्यामुळे, नश्वर स्वर्गीय सुखाला तो मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मानणारा नव्हता. आपला

BARR. ... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

हा विचार त्याने मेघदूतात व्यक्त केला आहे. तेथे तो लिहितो -

> प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृध्दान्
> पूर्वोद्दिष्टामनुसर पुरीं श्रीविशालां विशालाम् ।
> स्वल्पीभूते सुचरितफले स्वर्गिणां गां गतानां
> शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत्खण्डमेकम् ।। मेघ.पूर्व ३०

याठिकाणी उज्जयिनी नगरीला त्याने स्वर्गाचा एक छोटासा तुकडाच मानले आहे, जो पुण्यवान लोकांनी आपले पुण्य संपत आल्यावर पृथ्वीवर आणलेला आहे. याचा अर्थच असा की, स्वर्गप्राप्ती ही ही अशाश्वत आहे याची जाणीव कालिदासाला होती. म्हणून त्याने कामना केली ती मोक्षाची. स्वर्गाची नव्हे. मानवाची आदर्श जीवनपध्दती त्याने रघुवंशातील राजांच्या जीवनक्रमाद्वारा रेखाटली आहे ती अशी -

> शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।
> वार्ध्दके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ।।' रघु. १/८

या श्लोकांत शेवटी मुक्ति म्हणजेच जन्ममरणाच्या फे-यांतून सुटका हेच मानवाचे अंतिम ध्येय असावे, असेच कालिदासाला सुचवावयाचे आहे.

जीवनातील सर्व आनंदाचा, सुखांचा योग्य त्यावेळी माणसांनी जरुर उपभोग घ्यावा, पण त्या सुखांचा गुलाम बनून राहू नये, कारण -

> स्वादुभिस्तु विषयैर्हृतस्ततो दुःखमिन्द्रियगणो निवार्यते । रघु. १९/४९

म्हणजे "एकदां मनुष्य या व्यसनांच्या अधीन झाला की त्यातून सुटणे फार अवघड असते." हा संदेश त्याने अग्निवर्णाच्या द्वारा वाचकांना दिला आहे.

याच्या बरोबर विरुध्द म्हणजे विवेकी व्यक्तींचे आचरण असते. ते सर्व सुखांच्या सांनिध्यात राहूनही त्यापासून अत्यंत अलिप्त असतात. ते इंद्रियांचे गुलाम नसून इंद्रिये त्यांची गुलाम असतात हा आपला विचार तो पुढील श्लोकात सांगतो.

प्राणानामनिलेन वृत्तिरुचिता सत्कल्पवृक्षे वने,
तोये काञ्चनपद्मरेणुकपिशे धर्माभिषेकक्रिया ।
ध्यानं रत्नशिलातलेषु विबुधस्त्रीसंनिधौ संयमो,
यत्काङ्क्षन्ति तपोभिरन्यमुनयस्तस्मिंस्तपस्यन्त्यमी ।। अभि. शा. ७/१२

उपभोग घ्यावा पण तोही संयमानेच. वेळीच सावध होऊन त्यातून माणसाला बाहेर पडता आले पाहिजे, असे कालिदासाचे मत होते. योग्य त्या वेळी योग्य तीच गोष्ट अंगिकारली पाहिजे. लहानपणी विद्याभ्यास, तरूणपणी गृहस्थाश्रम व उत्तरायुष्यात सर्व सुखापासून निवृत्त होऊन मोक्षाविषयी तळमळ उत्पन्न झाली पाहिजे व त्यासाठीच राहिलेले आयुष्य त्याने ध्यान, धारणा, चिंतन, मनन इ. मध्ये खर्ची घातले पाहिजे असे त्याचे मत होते. यावरून कालिदासाला मनुस्मृतीत सांगितलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था मान्य होती असे दिसते.

कालिदास हा मोक्षाभिलाषी होता हे सांगणारे आणखीनही कांही श्लोक रघुवंशात आले आहेत.

१] विषयेषु विनाशधर्मसु त्रिदिवस्थेष्वपि निःस्पृहोऽभवत् ।। रघु. ८/१०
या श्लोकार्धात स्वर्गसुखाची क्षणभंगुरता कालिदास सांगतो.
तर २] अनपायिपदोपलब्धये रघुराप्तैः समियाय योगिभिः ।। रघु. ८/१७
येथे रघूची मोक्षप्राप्तीविषयीची तळमळ आणि त्यासाठी तो घेत असणारे श्रम याचे वर्णन कालिदास करतो.

३] अथ कश्चिदजव्यपेक्षया गमयित्वा समदर्शनः समाः ।
तमसः परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघुः ।। रघु. ८/२४

येथे योगसमाधिद्वारा रघूने मोक्ष मिळविल्याचे तो सांगतो.

४] यशोभिराब्रह्मसभं प्रकाशः स ब्रह्मभूयं गतिमाजगाम ।
ब्रह्मिष्ठमाधाय निजेऽधिकारे ब्रह्मिष्ठमेव स्वतनुप्रसूतम् ।। रघु. १८/२८

येथे हा कौसल्य ब्रह्मत्वगतिप्रत म्हणजेच मुक्ति मिळविता झाला असेच कालिदासाला सांगावयाचे आहे.

या सर्व श्लोकांवरून कालिदास हा मोक्ष हेच जीवनाचे अंतिम ध्येय मानणारा होता हे स्पष्ट होते.

<u>कर्मवाद व पुनर्जन्म</u> - स्वर्गप्राप्ती ही नश्वर असून पुण्य संपल्यावर जीवाला पुन्हा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो असे मानणाऱ्या कालिदासाचा पुनर्जन्मावर विश्वास होता हे निश्चितच. कारण वरील विधानातच ही गोष्ट अनुस्यूत आहे. या संदर्भात महामहोपाध्याय वि. वा. मिराशी यांचे विचार लक्षांत घेण्यासारखे आहेत. आपल्या "कालिदास" या ग्रंथात ते म्हणतात.

" कालिदासाचा कर्मवाद आणि पुनर्जन्मावर विश्वास होता. आपल्या कर्मामुळेच उर्वशी तसेच हरिणी या २ अप्सरांना मृत्युलोकांत यावे लागले. आत्म्याला स्वकर्मानुसार मरणोत्तर गति प्राप्त होते. तेव्हां तुझ्या देहत्यागानंतर तुला परलोकांत आपल्या पत्नीचा सहवास प्राप्त होईलच असे समजूं नकोस, असे म्हणून वसिष्ठांनी अज राजाला पत्नीं - शोकातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला होता. केलेल्या कर्माचे फळ माणसाला भोगावेच लागते. ज्ञानामुळे कर्म दग्ध होते. हे भगवद्गीतेचे तत्त्व कालिदासाने "इतरो दहने स्वकर्मणां ववृते ज्ञानमयेन वह्निना" या श्लोकार्धात सांगितले आहे.

कालिदासाचा पुनर्जन्मावर विश्वास होता ही गोष्ट आणखीनही कांही उदाहरणावरून सिध्द होते.

रामाने त्यागिलेली सीता दोष आपल्या पतीला देत नाही तर पूर्वजन्मीच्या कर्मांना देते. व म्हणते कीं, -

" ममैव जन्मान्तरपातकानां विपाकविस्फूर्जथुरप्रसह्यः ।" रघु. १४/६२
"भूयो यथा मे जननान्तरेऽपि त्वमेव भर्ता न च विप्रयोगः । रघु. १४/६६.
येथे जन्मांतरी देखील तूंच पती म्हणून मिळावास अशी कामना सीता करते.

सीतेने काढलेले उद्गारच शकुन्तला दुष्यन्ताबरोबरच्या आपल्या पुनर्भेटीत काढते. ती म्हणते, -

नूनं मे सुचरितप्रतिबन्धकं पुराकृतं तेषु दिवसेषु
परिणामाभिमुखमासीधेन सानुक्रोशोऽप्यार्यपुत्रो मयि विरस: संवृत्त: ।
अभि. शां. ७

येथे पुर्वजन्मीच्या पापांमुळेच मी आपल्याला दुरावले असे शकुन्तला म्हणते. म्हणजे ती ही दोष देते तो आपल्या पुर्वजन्मीच्या पातकांना.

या सर्व गोष्टींवरून कालिदासाचा पाप-पुण्य, पुनर्जन्म, कर्मवाद, इ. गोष्टींच्यावर पूर्ण विश्वास होता, हीच गोष्ट सिध्द होते. या जन्मी माणसाने कोणतेही वाईट कृत्य केलेले नसले तरीही पूर्वजन्मीं जर त्याने कांही पाप केले असेल तर त्याचा परिणाम म्हणून या जन्मी त्याला दु:ख भोगावे लागते. म्हणजे केलेल्या चांगल्या अथवा वाईट कर्मांची फळे त्या किंवा पुढच्या जन्मी माणसाला भोगावीच लागतात असे त्याचे मत होते असे यावरून दिसते. म्हणूनच जन्ममरणाच्या फे-यातून कायमची सुटका त्याने भगवान् शंकराजवळ मागितली आहे.